REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# प्रा. आप्पासाहेब खोत : बदलत्या ग्रामीण जीवनाचे भेदक चित्रण करणारा कथाकार

प्रा. डॉ. डी. आर. गायकवाड
मराठी विभाग, दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय,सोलापूर.

**प्रस्तावना :**

आधुनिक मराठी साहित्यातील एक अत्यंत महत्त्वाचा व लौकिकप्राप्त वाङ्‌मयप्रवाह म्हणजे ग्रामीण साहित्य होय. दलित साहित्य जसे परिवर्तनाचे अपत्य आहे तसे ग्रामीण साहित्यही परिवर्तनाचे अपत्य आहे. ”केवळ ग्रामीण परिसराचे आणि त्या परिसरात राहणा-या माणसांचे चित्रण म्हणजे ग्रामीण साहित्य नव्हे. कृषी संस्कृतीत जगणा-या माणसांचे जीवन, त्यांचे संघर्ष, व्यथा वेदना आणि समस्यांना सामोरे जावे लागणे, त्यांच्या आशा.आकांक्षा, स्थिती गती यातून निर्माण झालेल्या जाणिवा व्यक्त करणारे साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य होय.” अशा प्रकारच्या लेखनाला ख-या अर्थाने सुरुवात १९५० नंतरच्या काळात झालेली असली तरी म. फुले यांनी १८८५ च्या दरम्यान 'शेतक-यांचा आसूड', 'ईशारा', 'गुलामगिरी', व 'सार्वजनिक सत्यधर्म' आदि ग्रंथांची रचना करुन या साहित्यप्रवाहाची मुर्हतमेढ रोवल्याची दिसून येते. त्यांनीच सर्वप्रथम ग्रामीण संस्कृतीचा महत्त्वाचा घटक असलेला शेतकरी, कष्टकरी, कामगार स्त्री पुरुषांचे दुःख आपल्या साहित्यातून मांडले. म.फुले यांच्या निधनानंतर ग्रामीण साहित्य लेखनाची परंपरा मधल्या काळात खंडीत झाल्याची दिसते; तथापि नंतरच्या काळात शिक्षणाचा खेडया-पाडयात झालेल्या प्रचार-प्रसारामुळे ग्रामीण साहित्य लेखन होताना दिसते. सामान्यतः १९४०-४५ च्या दरम्यान ग.ल.ठोकळ, र. वा. दिघे, श्री.ना. पेंडसे व श्री. म.माटे यांनी आपल्या कविता, कथा व कादंबरीतून ग्रामीण जीवनाचे ग्रामीण भाषेतून चित्रण केले.

१९६०च्या दशकात शंकर पाटील, द.मा. मिरासदार व व्यंकटेश माडगूळकर या त्रयिनी ग्रामीण जीवनाचे अस्सल चित्रण आपल्या कथा—कादंबरीतून घडवून ख-या अर्थाने ग्रामीण साहित्याला प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. दरम्यानच्या काळात आनंद यादव, नागनाथ कोत्तापल्ले,म.भा. भोसले, महादेव मोरे सखा कलाल रा.र. बोराडे, उध्दव शेळके, द.ता.भोसले, मोहन पाटील व चंद्रकुमार नलगे आदि मान्यताप्राप्त ग्रामीण लेखकांनी ग्रामीण जीवनाचे प्रखर चित्रण आपल्या कथा—.कादंबरीतून वैविध्यपूर्ण व वैशिष्टयपूर्ण रीतीने घडून मराठी साहित्याच्या समृध्दीत मोलाची भर घातली. या परंपरेतील आणखी एक महत्त्वाचे लेखक म्हणजे प्रा. आप्पासाहेब खोत हे होय. तथापि ते एक लेखक म्हणून नावारूपास आले १९९० नंतरच्या काळानंतरच होय. त्यांची आज गवनेर (१९९२), महापूर (१९९६), रानगंगा (१९९९), कळवंड (२०००), माती आणि कागूद (२००५) तसेच 'मरणदारी', 'वापसा' व 'अनवाणी पाय' हे कथासंग्रह तसेच 'पळसफूल', 'गावपांढर', 'गावपंढरीच्या वाटेवर', 'घरपण', 'फेसाटी' व 'सावलीची सोबत' इ. कादंब-या,'देवमाणूस.कर्मवीर भामुराव पाटील', 'महाराजा प्रताप' ही चरित्र पुस्तकेंही त्यांची प्रसिध्द आहेत. शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर व वामन होवाळानंतर मराठी कथाकथनाची परंपरा मोठया निष्ठेने व कष्टाने पुढे चालू ठेवलेल्या प्रा. आप्पासाहेब खोत यांची कथा त्यांचे समकालीन प्रतिमा इंगोले, सदानंद देशमुख, आनंदपाटील, भास्कर बढे, शंकर सखाराम, दादाराव मुसळे, दादासो मोरे, व.बा.बोधे, विजय जाधव, नामदेव माळी व श्रीकांत देशमुख आदि समकालीन कथालेखकांहून आशय व अभिव्यक्तिच्या अंगाने निश्चितच वेगळी असून वाचकांच्या मनावर वेगळा ठसा त्यांच्या कथांनी उमटविला आहे. प्रस्तुत-शोधनिंबधात त्यांच्या कथांचा वेगळेपणा व ग्रामीण साहित्याच्या विकासातील त्यांच्या योगदानाचा वर्णनात्मक व तुलनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करुन कांही निवडक कथांच्या अभ्यास येथे अपेक्षित आहे.

अनुभव हा साहित्याचा मुलभूत घटक असला तरी तो कोणत्या पातळीवरचा आहे, कोणत्या गुणवैशिष्ट्याने नटलेला आहे, तो कोणत्या जीवनाला गोचर करतो, त्यात किती अपूर्वत्व आहे अन् तो कुणी नि कसा व्यक्त केलेला आहे, यावरच त्या साहित्यकृतीचे मोठेपण अवलंबून असते आणि अशा अविष्कारामुळेच साहित्याचा प्रवाह व्यापक, सखोल नि नवी दिशा दाखविणारा ठरत असतो. या पार्श्वभूमीवर जन्मभूमी व कर्मभूमी दोन्ही खेडंच असलेल्या खोतांच्या कथात १९८०च्या दशकानंतरची ग्रामीण स्थित्यंतरे पहायला मिळतात. वैविध्यपूर्ण व वैशिष्टयपूर्ण लेखन करणारे आप्पासाहेब खोत आज ग्रामीण कथालेखक म्हणून साहित्यात स्थिर झाले आहेत. स्वतःची एक ओळख त्यांनी निर्माण केली आहे. त्यामुळे ग्रामीण कथेतील त्यांची बलस्थाने कोणती? 'गवनेर' पासून 'माती आणि कागुद' पर्यंत त्यांची कथा कसकशी विकसीत होत गेली? कोणत्या तीव्रजाणीवेतून त्यांच्या कथातून व्यक्त होतात हे पहाण्यासाठी तसेच त्यांनी दिलेल्या योगदान पाहण्यासाठी त्यांच्या कथांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. मराठी माती आणि मराठी संस्कृतीचा आविष्कार आपल्या साहित्यातून प्रा. आप्पासाहेब खोत यांनी समर्थपणे घडविलेला आहे. संवाद हा खोतांच्या कथेचा आत्मा आहे. संवादातून त्यांची कथा आकार घेत जाते. ब-याच वेळेला कथेची सुरुवात आणि शेवटही संवादानेच होतो. निवेदनापेक्षा संवादावर लेखकाची भिस्त जास्त आढळते. पात्रांचे स्वभावदर्शन, संघर्ष, ताणेबाणे हे व्यक्त करण्यासाठी प्रा.खोत संवादाचा मोठया खुबीने वापर करतात. छोटया छोटया नैसर्गिक संवादातून कथानक वाचकाच्या मनाची पकड घेते.त्यांच्या कथांचे दुसरे वैशिष्टय म्हणजे त्यांनी कथानकाच्या विकसनात केलेला फ्लॅशबॅकचा वापर. त्यांच्या ब-याच कथा वर्तमानकाळातून भूतकाळात जातात आणि पुन्हा वर्तमानात येऊन संपतात. क्वचित कधी त्यामुळे एकसूरीपणा आल्यासारखेही वाटते. मात्र ब-याच कथा फ्लॅशबॅकमुळे अतिशय प्रभावीही झाल्या आहेत.खेडयातील आयुष्ये ही पूर्णतः मातीवर अवलंबून असलेली. साहजिकच त्या जगण्यात अस्थिरता आहे. दारिद्रय हा इथला स्थायीभाव. वर्षभर श्रध्देने राबूनही त्याचे फळ मिळेलच असे नाही. हा इथला विचित्र न्याय. पराकोटीच्या दारिद्रयामुळे मग येते नियतीशरणता, नैराश्य. या दृष्टीने त्यांच्या'घालमेल' कथेतील बापूची आणि 'माती आणि कागुद' मधील शंकर जगतापाची वेदनाही अशा आशयाची आहे.

भारतीय शेती पावसावरचा जुगार म्हणून ओळखली जाते अवेळी पडलेल्या पावसामुळे बापूच्या काढणीला आलेल्या हायब्रीडंचं मोठे नुकसान होते. हातातोंडाला आलेला घास मातीत जातो. याउलट लाग-लागवड, रासायनिक खते, सोसायटीची उचल, इरिगेशनची पाणीपट्टी या सर्व कात्रीतून शंकर जगतापच्या हाती उसाचे कोरे बिल येते. एका बाजूला अनियमितत पाऊस आणि दुस-या बाजूला अनियंत्रीत दलाल यांच्या कात्रीत सापडलेला शेतकरी अगतिक जीणं जगतो आहे आणि म्हणूनच न थांबणा-या पावसाकडे पाहून संतापाने बापू म्हणतो, "वत! चांगला वत!! काय वाद सादायचा तो साद. कुण्या जलमाचा वाद्या होऊनच आलाईस. औंदाच तुला नॅट आलाय. उभा जलम चौकडं नशिबावान गाळलाय. त्येला तू तरी काय करशील म्हणा! चांगला वाद साधून घे. हायब्रीडचं वाटोळं होईस्तवर वत!" तर हाताती, फायनल बिलाच कागद पोराकडे फेकून शंकर जगताप उसळतो... "वरीस दीड वरीस चिकुल तुडवून रक्तांच पाणी केलं. रातीचा दिस केला आणि ऊस पिकवला आणि ह्ये बग हाता काय आलं - धतुरा."चहूबाजूंनी झालेली ग्रामीण शेतक-याची कोंडी 'सौदा', 'गळफास' या तसेच इतरही ब-याच कथातून खोतांनी पोटतिडकीने मांडली आहे. खोतांची लेखणी बदलणारे ग्रामीण वास्तव जागरुकपणे टिपते. आज वाढती बेरोजगारी, व्यसनांची.चैनीची वाढती साधने यामुळे ग्रामीण तरुणाई दिशाहिन होत आहे. ग्रामीण भागात बेजबाबदार वाढत आहे. यात वडिलधाऱ्यांची कुचंबणा होत आहे. एका बेजबाबदार पोरं, दुस-या बाजूला कर्जात ढकलणारी शेती यामुळे आर्थिक आणि कौंटुबिक पातळीवर नैराश्य आलेले अनेक शेतकरी आज आत्महत्या करत आहेत. शेतक-यांच्या याच प्रश्नांवर 'गळफास' ही कथा नेमकेपणाने भाष्य करते. आज शेतक-यांच्या वाढत्या आत्महत्या ही एक सामाजिक समस्याच बनली आहे. निढविलेले राज्यकर्ते व्यसनामुळे हे घडत आहे' अस बेमुर्वतखोरपणे सांगत आहेत. अशावेळी खोतांची लेखणी आत्महत्येमागेच एक डोळस कारण 'गळफास' कथेतून मांडते. ही संपूर्ण कथा वाचताना डोळे पाणावतात व शेतक-यांच्या दुर्दशेची कल्पना येते.

'एकत्र कुटुंब व्यवस्था' ही खेडयातील एक आदर्श कुटुंब व्यवस्था.अनेक वर्ष चालत आलेल्या या परंपरेला आज तिला तडे गेले आहेत. एकसंघ कुटुंबात सुखदुःखे वाटून घेतली जात. सण.उत्सव जल्लोषाने साजरे होत. पण आज फुटलेल्या कुटुंबामुळे खेडयातील सांस्कृतिकतेला तडे गेले आहेत. अकृत्रिम जिव्हाळा नष्ट होऊन औपचारिकता येत आहे. माणसे संवेदनाहिन बनत आहेत. घरादाराच्या, शेताभाताच्या वाटाण्या होतात हे आपण

समजू शकतो पण आज खेडयात आई.वडीलांच्याही वाटण्या केल्या जात आहेत. या भेदक स्थितीवर खोतांची 'वाटणी' ही कथा प्रकाश टाकते. वस्तू असल्याप्रमाणे जन्मदात्या आई-वडिलांच्या मनाचा विचार न करता आपल्या सोयीसाठी त्यांना वृध्दावस्थेत एकमेंकापासून तोडून वेगळे करणे ही पराकोटीची संवेदनशून्यता पाहून खोतांची लेखणी हळहळते.

'वाटणी' कथेत लिंबाजी या वृध्दाचे मुलगे त्याची व पत्नीची वाटणी करतात. ती करताना ते स्वतःची सोय पाहतात. त्या वृध्द जीवांच्या मनाची पर्वा करत नाहीत. एवढंच नव्हे तर स्वतःतल्या वैयक्तिक भांडणामुळे त्या दोघांना भेटण्यासही मनाई करतात. लिंबाजीला थोरल्या मुलाच्या जनावराकडे लक्ष देण्यासाठी रानात ठेवलं जातं तर त्याच्या वृध्द पत्नीला धाकटा मुलगा आपला लहान मुलांना सांभाळण्यासाठी ठेवून घेतो. एका वेगळया विषयावरची ही कथा वाचकाला अंतर्मुख करते. एका सामाजिक समस्येवर भाष्य करणारी ही कथा कालसुसंगत आशय व वैशिष्टपूर्ण रचनातंत्रामुळे दीर्घकाळस्मरणात राहते.

वाटा चुकत असलेला ग्रामीण माणूस हा खोतांच्या जिव्हाळयाचा विषय ग्रामीण स्थित्यंतरांचा 'विधायक' आणि विघातक' अशा दोन्ही अंगाने ते आढावा घेतात. त्यांच्या 'भोग' यासारख्या ब-याच कथातून नव्या विधायक विचारांचे स्वागत आहे तर गळफास, घर आणि बंगला, दस-याची कडाकणी यासारख्या कथातून चुकत असलेल्या दिशांची मिमांसा त्यांची कथा करते. यातून सामाजिक विरोधाभासावर ते नेमकेपणाने भाष्य करतात.

विविध कारणांने खेडयातील माणसांत येत असलेल्या कोरडेपणा खोतांच्या लेखणीला अस्वस्थ करतो. नात्यांत निर्माण होत चाललेली दरी, येत चाललेली शहरी कृत्रिमता पाहून त्यांचे संवेदनशील मन अस्वस्थ होते. समाजातील भ्रष्टाचार, अनाचार, दुःखितांच्या वेदना, उपेक्षितांची होणारी होरपळ ही जशी त्यांच्या कथातून येते, तशीच कौटुबिंक नात्यातील दुरावत चाललेल्या जिव्हाळा, हरवत चाललेली माणुसकी यांच प्रत्ययकारी चित्र त्यांच्या कथांतून आलेलं आहे. अस्सल 'घरपण' आणि 'मातीपण' कसं असावं याच्याही सूचना करणा-या कथा आहेत. ग्रामीण जीवनातील होणारा कौटुबिंक विस्फोट मनाला चटका लावून जातो. यादृष्टीनेही त्यांच्या कथा पाहाण्यासारख्या आहेत. 'घर आणि बंगला' या कथेतील आनंनदा दादा-वहिनीच्या कष्टाने शिकतो. प्राध्यापक होतो. शहरात बंगला बांधतो. स्वतः छानछोकीचे आयुष्य जगतो पण खेडयात राहाणा-या आपल्या भावाला विसरतो. विहिरीवर मोटार बसविण्यासाठी थोरल्या भावने पैसे मागितल्यावर बंगल्याच्या कर्जाचे कारण पुढे करुन पैसे देण्याचे टाळतो. एवढेच नव्हे तर स्वतःच्या नावाची जमिनही विकायला काढतो. दादा-वहिनीचा घरातून निघताना दानशूरपणाला आव आणत शंभर रुपयाची नोट वहिनीच्या हातावर टेकवतो. 'दस-याची कडाकणी' या कथेतील वसंता आणि सदरच्या कथेतील आनंदा ही मातीला विसरणा-या आजच्या 'शहराळलेल्या' पांढरपेशी वर्गाचे प्रतिनिधी आहेत. कथा वाचताना डोळयांच्या कडा ओलावतात. मग कथा आपलीच वाटते. यातच प्रा. खोतांच्या लेखनाचे सामर्थ्य आहे.

'सोन्याची आई' ही बजरंग या विधुराची दुर्दैवी कथा आहे. पत्नीच्या मृत्युने तो एकाकी झाला आहे. सोन्या नावाच्या लहान पोरासाठी जगतो आहे. त्याच्या परिस्थितीचा फायदा घेऊन त्याच्या दोन्ही भावजयी त्याचा संसार लुटू बघतायेत. त्यालाही ते जाणवते त्याच्या मनाला वेदना होतात. तो बहिणीच्या गावाला आपल्या पोरांसह जातो पण तेथेही बहिणीच्या सासूचं आपल्याविषयी रागाचं बोलणं ऐकतो. पुढे सासरवाडीस जातो. तेथेही माणुसकीहिनतेचाच अनुभव त्याला येतो. आणि एकाकी, दुःखी बजरंगचं दुःख अधिक गडद होत जातं. माणसातील संवेदनशून्यता, आटत चाललेली माणूसकी यावर 'सोन्याची आई' ही कथा प्रभावी भाष्य करते. 'अदावत' या कथेतून एकत्र कुटुंबातील ताणतणाव, त्यातील व्यक्तींचे स्वभावदर्शन अतिशय वास्तववादी शैलीत मांडले आहेत. घरातील सासूबाईंच्या हरवलेलया पैशाच्या बटव्यामुळे घरात निर्माण झालेला ताण आणि बटवा सापडल्यावर आलेला सैलपणा नेमक्या शब्दात उभा करण्यात लेखक यशस्वी झाला आहे.

प्रा.खोत यांच्या कथेतील स्त्री जाणीवा अभ्यासनीय आहेत. 'स्त्री' खोतसरांच्या साहित्याच्या केंद्रस्थानी आहे! ग्रामीण स्त्रीची विविध रुपे त्यांच्या कथा कादंब-यातून व्यक्त होतात. पळसफूल, घरपण, सावलीच सोबत या त्यांच्या कादंब-याही नायिकाप्रधान आहेत.अगतिक, जिद्दी, दुर्दैवी, संवदेनशील, कुटुंबवत्सल, सोशिक, बंडखोर अशी स्त्रियांची विविध रुपे त्यांच्या कथातून आकार घेतात.'दस-याची कडाकणी' या कथेतील नायिका गिरजा मावशी ही महार विधवा पती विहिरीत सुरंग घालत असताना स्फोट होऊन मरतो. एकाकी गिरजामावशी पोराला जिद्दीने शिकवते. चर्च कौन्सीलच्या बोर्डींगमध्ये ठेवते. पोराला आपल्या हातची कडाकणी आवडते म्हणून कित्येक मैलांची

पायपीट करुन त्याला कडाकणी देते. पुढे पोरगा शिकतो. एस.टी.त नोकरीला लागतो. शहरात राहू लागतो आणि आई त्याला परकी वाटू लागते. कुडाच्या झोपडीतील तिचं दरिद्री जगणं त्याला उबग आणतं. लग्नही तो आईला न कळवता परस्परच करतो. बायकोला घेऊन उभ्याउभ्या भेटायला येतो. तीही लांबूनच उभ्याउभ्या नमस्कार करते. गिरीजामावशीच्या हातची कडाकणी तिला किळसवाणी वाटते. ती झोपडीबाहेर जाते. भाडयाच्या गाडीत जाऊन बसते. वसंताही आईच्या कडाकणी खाण्याचा प्रेमळ आग्रह नाकारुन बायकोमागून जातो. असहाय्य गिरीजामावशीचे भावविश्व कोलमडून पडते. तिला तो धक्का सहन होत नाही. ती वेडीच होते. ही कथा शहारळलेल्या, नाती विसरत चाललेल्या तरुणांच्या संकुचित मनोवृत्तीवर नेमकेपणाने प्रकाश टाकते. खेडयातून शहरात जाऊन स्थिरझालेला असा एक वर्ग तयार होत आहे की ज्याला खेडयातील भाषा गांवढळ वाटू लागली आहे. सण-उत्सव वेळेचा अपव्यय वाटू लागला आहे. एकूणच सगळं जगणं खालच्या पातळीवरचं वाटू लागलंय. आजही अशा अनेक गिरीजामावशी खेडयांतून अगतिक आयुष्य जगत आहेत. ग्रामीण संस्कृतीतील नष्ट होत चाललेला जिव्हाळा नाती–गोती यावर प्रा. खोत याने आपल्या कथांतून नेमकेपणाने भाष्य केले आहे.

परंपरा, बुरसट विचार झुगारुन देणारी स्त्री खोतांच्या कथेत ब-याचवेळा येते. त्यांच्या 'पळसफूल' या कादंबरीतील सासू ही विधवा सूनेचा पूनर्विवाह करण्याचा परिवर्तनवादी निर्णय घेते. ग्रामीण समाजातील स्थित्यंतरे टिपताना ग्रामीण स्त्रीचे जागे होत असलेले आत्मभान त्यांच्या कथातून अवतरते. 'भोग' ही ग्रामीण स्त्रीचं नवं रुप दाखवणारी कथा आहे. 'दस-याची कडाकणी' तील गिरीजामावशी अगतिक आहे तर 'भोग' कथेतील शांता जिद्दी आहे. तिचा नवराही अकाली मरतो. तोंडात पदराचा गोळा घालून ती मुलांना वाढवते. पुढं मुलं मोठी होतात. वेगळया चुली मांडतात. शांता धैर्याने आपल्या धाकटया मुलीसह वेगळी राहू लागते. पण एक दिवस पोरीच्या केसात तिला जठ झालेली दिसते आणि ती सैरभैर होते. पोरीचा उध्वस्त भविष्यकाळ तिला दिसू लागतो आणि ती जठ कापून टाकण्याचा निर्णय घेते. कापताना मुलगी ओरडते तर 'जरा सोस लेक! न्हायतर जलमाचं दुकणं हून बसलं.' म्हणून खडसावते.

प्रा.खोत यांची कथा घटनाप्रधान असते. पण ती निव्वळ घटना नसते. 'महापूर' ही त्यांची कथा हिरा नावाच्या एका दुदैंवी स्त्रीची शोकांतिक आहे. ही स्त्रीही विधवाच आहे. पूरासारख्या नैसर्गिक संकटामुळे रक्ताच्या नात्यातील फोलपणा तिला कळतो आणि ती रक्ताच्या भावाऐवजी ओढयालाच भाऊ मानून मुलांसह पलिकउे सुखरुप सोडण्याची विनंती करते. छातीला बिलगलेल्या पोरांसह वाहून जाते.

पशूपक्ष्यांवरील निर्व्याज प्रेमही खोतांच्या ब-याच कथातून दिसून येते. त्यांच्या 'चिमणीच घरटं' आणि 'रानगंगा' या कथातून पक्षी, प्राणी आणि मानव यांच्यातील निर्व्याज प्रेम दिसून येते.'चिमणीच घरटं' तील नायिका संवेदनशील आहे. कामाच्या धबडग्यातही तिने चिमण्यांशी आपले एक स्वतंत्र भावविश्व जपले आहे. ते भावविश्व तिच्या पतीला 'अपरिचित' आहे. त्यामुळे घरी आलेल्या चिमण्यांशी तो निर्दयपणे वागतो. एका चिमणीच्या पायाला दोरीने बांधून ठेवतो. दुस.या एकीला पाण्यात बुडवून काढतो. त्यामुळे चिमण्या घरीच यायच्या बंद होतात. त्यामुळे तो अस्वस्थ होते. कातर होऊन नव.याला विचारते. "धनी, चिमण्यांबिगर कसं जगायच वं ?" आणि मग रोज चिमण्या याव्यात म्हणून मूठभर तांदूळ अंगणात विस्कटते. मराठी साहित्यात चिमणीचे निरागस अस्तित्व ब-याचवेळा जाणवते. मात्र 'चिमणीचं घरटं' कथेतील चिमणी वाचकाला अस्वस्थ करुन जाते.

'रानगंगा' कथेतील हौसामामी घरातील म्हैशीकडे जनावर म्हणून पहात नाही तर आपलीच जीवाभावाची मैत्रिण म्हणून पहाते. तिला गंगा हे नाव देते. आईच्या ममतेने तिला जपते. पुढे नातीच्या लग्नासाठी कुठलाच पर्याय उरत नाही तेव्हा काळजावर दगड ठेवून 'गंगा' म्हैशीला विकते. पण त्या परगावच्या परक्या घरातून गंगा दवं तोडून पळते. वाट शोधत हौसामामीच्या दारात येते. हौसामामीा मायेने चाटते. पशु आणि मानव यांच्या उन्नत पातळीवरचा नातेसंबंध या कथेतून उत्कटपणे जाणवतो.

'चुकवा' ही खोतांची एक उत्कृष्ठ कथा. आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टीनी ही कथा सरस आहे. एक साधा प्रसंग अतिशय कलात्मतेने फुलवून सांगत लेखकाने सम गाठली आहे. सोनामावशीचा मुलगा तिच्या सासुरवाशी लेकीला भाऊबीजेला आणायला दुचाकी घेऊन गेला आहे. संध्याकाळ झाली तरी तो परत आला नाही. त्यामुळे विचित्र, अशुभ विचारांनी सोनामावशीला हैराण केले आहे. विविध विचारांची आवर्तन तिच्या मनात गिरक्या घेत आहेत. तिच्या मनाची घालमेल अतिशय परिणामकारक शैलीत लेखकाने मांडले आहे. सोनामावशीच्या मनात निर्माण झालेला प्रचंड ताण आणि उशिरा आलेल्या मुलाने ताईला दिवस गेल्याची सांगितलेली बातमी ऐकून त्या

तीव्र ताणाचे तेवढयाच तीव्रतेच्या आनंदात झालेले रुपांतर लेखकाने मोठया नाटयमय शैलीत वाचकापुढे उभे केले आहे.

'डव्हाळ' हीही खोतांची एक उल्लेखनीय कथा रंगू ही सासुरवाशीण. तिला पहिल्यांदाच दिवस गेले. खर्डा-लोणी खाण्याचे डोहाळे तिला लागले आहेत. पण खाष्ट सासूकडून तिची आबाळ होत आहे. केवळ शिळी भाकरी तिच्या वाटयाला येते. मंजुरीला गेल्यावर मग ती अनावर इच्छेने सोनाबाईची खर्डा-लोणी असलेली भाकरी चोरुन खाते; पण आपण पाप केलं आहे. याची बोचणी तिच्या मनाला लागते. ती कुढत राहते. शेवटी सोनाबाईला एकांतात गाठून ती सर्व सांगते. एका वेगळया विषयावरती ही कथा दारिद्रयावर भीषण प्रकाश टाकते. अगतिक रंगूविषयी वाचकाच्या मनात अपार सहानुभूती निर्माण होत.

अशीच सहानुभूती 'चूलीचं लाकूड' मधील लक्ष्मी विषयी वाटते. ही गरीबाघरची लेक. जाऊ श्रीमंताघरची, त्यामुळे घरात तिचीच सत्ता. नवरा दुबळा. त्यामुळे लक्ष्मी जाऊ-दिराचा सासुरवास मुकाटयाने सोसते. जळत्या लाकडासारखी जळत जाते. मुकाटयाने सोसणारी स्त्री खोतांच्या ब-याच कथांतून सुन्नपणे वावरते. खेडयात आजही प्रभावी पुरुषसत्ताक पध्दती आहे. त्यामुळे पुरुषी वर्चस्वाखाली भरडणारी स्त्री ब-याच वेळा खोतांची लेखणी हळवी बनवते. एकूण स्त्रियांची वैविध्यपूर्ण रुपे त्यांनी कलात्म भान राखून आपल्या कथांतून मांडली आहेत. या सर्वच कथातून येणारी कोल्हापूरी बोली भाषा तसेच अनेक म्हणी—वाक्यप्रचार यांच्या वापरांमुळे कथा वाचताना संपूर्ण परिसर एखाद्या चित्रपटासारखा आपल्या डोळ्यासमोर उभा राहतो. हे लेखकाच्या लेखनाचे वैशिष्ट्ये होय.

वृध्दत्वाची उपेक्षा ही आजची एक गंभीर सामाजिक समस्या बनली आहे. वाढत्या वृध्दाश्रमांची संख्या हे चित्र मानवतेला कलंक लावणारे आहे. आयुष्याच्या 'दिवेलागणी' वेळी वृध्दांना निरामय जीवन जगू द्यायला हवं. उतरणीच्या शेवटच्या पायरीवर संथपणे रेंगाळणा.या या असहाय्य जीवांना हळूवार समजून घ्यायला हवं पण जगण्याच्या गडबडीत बोथट होत चाललेल्या जाणीवामुळे याचे भान कुणालाही नाही. 'विभक्त कुटुंब' नावाच्या रोगाची लागण हळूहळू खेडयालाही लागली आहे. त्यामुळेच वृध्दत्व हळूवार जपणारी भावना खेडयांतूनही नष्ट होत आहे. खोतांच्या संवेदनक्षम मनाला हे जाचते. त्यांच्या एकूण साहित्यात वृध्दांच्या वेदनेलाही मोठे स्थान आहे. सदर संग्रहातील 'वाटणी', जोजंकार' या कथातून तसेच अन्य बऱ्याच कथातून वृध्दांची घालमेल त्यांनी टिपली आहे. एकेकाळी खेडयांत वृध्दांना कुटुंबात मानाचं स्थान होतं. त्यांचे विचार 'मुरब्बी' म्हणून स्विकारले जात. त्यांची आदरयुक्त भिती कुटुंबाला असे; पण आज त्यांना अडगळीत लोटलं जात आहे. हे बरोबर नाही किंबहुना ही गोष्ट काळजी करायला लावणारी आहे हे वास्तव लेखक प्रखर रितीने येथे मांडतो.

'जोजंकार' कथेतील ज्ञानूतात्याचा मुलगा घरचा म्हातारा बैल त्यांना विचारात न घेता विकायला काढतो. 'राजा' बैल ज्ञानूतात्यांच्या सोबतीने त्यांच्या संसारात राबला. आता तो वृध्द झाला आहे. ज्ञानूतात्याही आता वृध्द झाले आहेत. त्यांच्या मतला किंमत नाही. मुलग्याला म्हातारा बैल नसती अडचण वाटते. तात्यांच्या भावविश्वाची त्याला पर्वा नाही. तात्या म्हणतात, "व्हय, खरं लेका! मरता समयाला त्याला कसाबाला कसं द्याचं रं?" तेव्हा मुलगा निर्विकापणे म्हणतो, "मग काय जाग्यावर किडं पडून मरु दे ? त्यापरास चार रुपये येतील. वैरणीची काडी नाही. त्यात ही अडचण. नुसता जोजंकारच की" ज्ञानूतात्याला पोरग्याचे हे बोल झोंबतात. आपल्या वृध्दत्वाचीच ही विटंबना आहे असे त्यांना वाटते ते दुःखी होतात, आणि छपरातून बाहेर पडता पडता म्हणतात, "दे बाबा कसाबाला कापायला. नशीब! टजून म्हाता-या माणसास्नी कसाब कापाय न्हेंत न्हाईत, न्हायतर...."भूतदया आटून अधिकाधिक व्यवहारी होणारी तरुण पिढीच प्रवृत्ती जशी ही कथा दर्शवते तसेच किंबहुना त्याहून जास्त वृध्द बैलाच्या माध्यमातून वृध्दत्वाची होणारी विटंबनाही व्यक्त करते. विविध प्रतिक—प्रतिमांचा वापर लेखक प्रा. आप्पासाहेब खोत मोठ्या खुबीने करताना दिसतात.

ग्रामीण माणूस हा कष्टप्रियच. बसून खाणा-या व्यक्तीला ग्रामीण समाजात आजही प्रतिष्ठा नाही. अगदी ८-१० वर्षाच्या पोरानेही कष्टात आपला खारीचा वाटा उचलावा. आपल्याला लागणाऱ्या चतकोर भाकरीएवढे श्रम करावेत, ही अपेक्षा केली जाते. या कष्टप्रिय जगण्यापुढे अडचणींचे अनेक डोंगर येतात. जगण्यातील जिद्द संपवू पाहातात. अथक मेहनतीचे 'दंड' असतानाही हा माणूस मग खचतो, पिचतो जो कथेतून हाच आशय अत्यंत प्रभावीपणे व्यक्त होतो. शिरपा हा कष्टाळू माणूस. बैलगाडीतून साखर कारखान्याला ऊस पोवण्याचे काम करतोय. त्यासाठी त्याने कर्ज काढून बैल गाडी विकत घेतली आहे. पहाटे साडेतीनला उठून, कडाक्याच्या थंडीत तो

फडात जातोय. हे काम एकटयाला अशक्य म्हणून मदतीसाठी त्याने गावातील एक फडकरी घेतलाय. त्याला पाच हजार रुपये ॲडव्हान्स दिलेत. आणि ऐनवेळी तो फडकरी 'मला हे काम झेपत नाही' म्हणतो. शिरपाच्या डोळयासमोर काजवे चमकतात. कारण गडयाशिवाय हे काम अशक्यच. त्या दिवसात दुसरा फडकरी मिळनेही मुश्किल. गाडी बंद ठेवावी लागणार. काढलेल्या कर्जाचे व्याज वाढत जाणार या विचाराने त्याला हातापायातून वारंच जातं. खेड्यातील लोकांचे दारिद्र्य, उपासमारी तसेच धनधांडग्यांकडून होणारी पिळवणूक, दादागिरी इत्यादीचे चित्रण ही प्रा. खोत मोठ्या कौशल्याने करतात. जगण्यातला अभावपणानं गारठून गेलेली. स्वतःचे अस्तित्व शोधू पहाणारी, वेदनेनं खचलेली, जिद्दीने प्रतिकूल आयुष्याला आव्हान देणारी, स्वतःच्या वेदना क्रुसासारखे मुकपणे वाहणारी, आत्मशोध घेणारी अशी विविध माणसे खोतांच्या लेखणीतून आकार घेतात. सर्वच स्तरातील जीवनदर्शने हे खोतांच्या लेखणीचे वैशिष्टय आहे.

सामाजिक बांधिलकीची जाण प्रा.खोत सरांच्या लेखनीला आहे. विकृत होत चाललेली ग्रामीण मूल्यव्यवस्थ, भौतिक सुबत्ता, दारिद्रय, राजकारणातून खेडयात आलेली दिशहिनता, निसर्ग-माणूस यांच्यातील तुटत चाललेले भावबंध यांचा वेध त्यांची कथा घेते. प्रभावी नाटयात्मकमुळे त्यांच्या कथा वाचकाला खिळवून ठेवतात.खेडयातील दुःख दारिद्रय, उपासमार यांचे दर्शन घडविताना त्याची कारणमिमांसा त्यांची कथा करते. या दृष्टीने त्यांची कथा सजग आहे. ग्रामीण वृत्ती-प्रवृत्तीवर अचूक भाष्य करणे हा त्यांच्या कथेचा पिंड आहे. १९९० नंतरच्या जागतिकीकरणामुळे आणि त्यानंतरच्या यांत्रिकीकरणामुळे बदललेल्या ग्रामीण जीवनावर नेमकेपणाने भाष्य करणाऱ्या आज जवळजवळ दीडशेहून अधिक त्यांच्या कथा उपलब्ध आहेत. या त्यांच्या कथांचा स्वतंत्ररित्या संशोधनात्मक अभ्यास होणे आवश्यक आहे.

थोडक्यात खोतांची कथा ही नुसतीच किस्सा अथवा घटना नसते. प्रखर सामाजिक जाणीवा त्यातून व्यक्त होतात. जोमदार आशयाच्या असतात. संवादातून फुलणारी ही कथा पाल्हाळ टाकून नेमकं वर्मावर बोट ठेवते. माणसाविषयी तिला प्रचंड आस्था आहे. मानव्यावर विश्वास आहे. विधायक बदलाची आस आहे. भाबडया, अडाणी ग्रामीण माणसांच्या शोषणाची चीड आहे. मातीतील माणसाविषयी आंतरिक कळवळा असणारी ही कथा मातीतून रुजून वर आली आहे. मराठी समीक्षकांकडून तिची म्हणावी तेवढी दखल घेतली गेली नसली तरी ती स्वतःची खास वैशिष्टये राखून आहे.कालसुसंगत कथानके, मोजके घटना-प्रसंग, प्रवाहीसंवाद, खास कोल्हापूरी ग्रामीण बोलीभाषा, जिवंत व्यक्तिरेखा, उत्कृष्ट निवेदनशैली इ. गुणवैशिष्टयामुळे प्रा. आप्पासाहेब खोत यांची कथा उल्लेखीन ठरते. ग्रामीण जीवनाचा सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय पट कलात्मक अंगाने मांडणा-या प्रा. आप्पासाहेब खोत यांनी ग्रामीण मराठी कथेच्या प्रवाहाला समृध्द करण्यात दिलेले योगदान महत्त्वपूर्ण ठरते.